# विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड

सीआयएन: एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
नोंदणीकृत कार्यालय: रिजन्ट चेम्बर्स, ७वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉइंट, मुंबई–४०० ०२१. दूरध्वनी: २२८२२७०८ फॅक्स: २२०४३९६९
ईमेल: cs.vinylchemicals@pidilite.com वेबसाईट: www.vinylchemicals.com

## सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडच्या सदस्यांची तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सदर सभेच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले कामकाज करण्यासाठी गुरुवार, दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता कमलनयन बजाज हॉल, बजाज भवन, नरिमन पॉइंट, मुंबई–४०० ०२१, येथे होईल व सदर सूचना सर्व सदस्यांना पाठविण्यात आली आहे.

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम १० सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ९१ चा पाठपुरावा करताना कंपनीचे सदस्यांचे रजिस्टर आणि समभाग हस्तांतरण पुस्तक शुक्रवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ ते गुरुवार, दिनांक १ सप्टेंबर, २०१६ (दोन्ही दिवस समाविष्ट) ह्या दरम्यान एजीएमसाठी आणि लाभांशाच्या वितरणासाठी बंद राहील.

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ मधील कलम १०८, कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ मधील कलम २० आणि सेबी (लिस्टिंगची जबाबदारी व प्रगटीकरणाच्या आवश्यकता) नियम २०१५ मधील नियम ४४, अन्वये कंपनीने आपल्या सदस्यांसाठी एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारा देण्यात आलेल्या ई–मतदान सुविधेच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.

दूरस्थ ई–मतदान सुविधा सोमवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होईल आणि बुधवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता बंद होईल. सदर तारिख व वेळेच्या नंतर दूरस्थ ई–मतदानाची परवानगी दिली जाणार नाही.

अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे २५ ऑगस्ट, २०१६ रोजी सदस्यांच्या/लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये ज्यांची नावे आहेत अशा व्यक्ती दूरस्थ मतदानाची सुविधा उपलब्ध करून घेण्यास पात्र असतील.

सभेची सूचना पाठविण्यात आल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य झाल्यास आणि अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे २५ ऑगस्ट, २०१६ रोजी समभाग धारण केल्यास, सदर व्यक्ती evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड मिळवू शकेल. यूजर आयडी व पासवर्ड मिळविण्याची तपशिलवार पद्धती सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे आणि कंपनीच्या वेबसाईटवर ती उपलब्ध आहे. ई–मतदानासाठी एनएसडीएल यांचेपाशी नोंदणी करण्यात आलेले सदस्य ई–मतदानाद्वारे त्यांचे मतदान करण्यासाठी त्यांची विद्यमान यूजर आयडी व पासवर्ड यांचा उपयोग करू शकतात.

ज्यांनी दूरस्थ ई–मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले असेल असे सदस्य सभेला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील. सभेला उपस्थित राहणाऱ्या आणि इतर कोणत्याही पद्धतीने मतदान न केलेल्या सदस्यांसाठी कंपनीद्वारे सभेच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

ई–मतदानासंबंधी काही चौकशी/तक्रार असल्यास, सदस्यांनी श्री. अमित विशाल, एनएसडीएल, ४था मजला, ए–विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई–४०० ०१३ (ई–मेल: amitv@nsdl.co.in, दूरध्वनी क्र. (०२२) २४९९ ४२००) येथे संपर्क साधावा.

संचालक मंडळाच्या आदेशाने

८ ऑगस्ट, २०१६
मुंबई

**पी. सी. पटेल**
**प्रेसिडेंट व सेक्रेटरी**